नि. फौ.ख.क्रं. ५/२०१८
शासन वि. अनिल
नि.क्र. ५५/क

**सरकारतर्फे साक्षीदार क्रं.०३ यांची शपथेवर जबानी**

नाव : संतोष भिमराव म्हस्के

वय : ४२ वर्षे

व्यवसाय : मजुरी

राहणार : दादेगाव ता. आष्टी जि. बीड

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री.व्ही.एस. गव्हाळे यांचेमार्फत**

**१.** मी कुटुंबीयासोबत दादेगाव येथे राहतो. फिर्यादी माझी पत्नी आहे. आरोपी शेजारी असल्याने ओळखतो. आरोपी क्र. २ आज न्यायालयात हजर आहे. नि. ५२ वरील आदेशाप्रमाणे आरोपी क्र. १ यांची ओळख न नाकारण्याच्या अटीसह हजेरीमाफी मंजुर. दि. २०/०८/२०१७ रोजी आरोपींनी त्यांच्या दारातील पावसाचे पाणी आमच्या दारात काढले. त्यामुळे माझी आई नामे गयाबाई हिने आरोपींना बडबड केली. त्याचा राग धरुन आरोपी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास आमच्या दारात आले व त्यांनी माझे गचुरे धरुन शिवीगाळ केली. मला मारहाण करत असतांना पत्नी फिर्यादी भांडणे सोडवण्यासाठी आली. तेव्हा आरोपी क्र. १ ने दगडी वरंवटा फेकुन मारला तो पत्नीच्या नाकावर व जबड्यावर लागला. त्यानंतर फिर्यादी खाली पडली. त्यानंतर आरोपी पळुन गेले. फिर्यादीच्या नाकावरील त्वचा निघाली. आम्ही अंभोरा पोलीस स्टेशनला गेलो. पोलीसांनी जखम झाली असल्याने आष्टी सरकारी दवाखान्यात पाठवले. तेथे फिर्यादीला टाके घेतले. त्यानंतर अ.नगर येथे सरकारी दवाखान्यात पाठवले.

२. आम्ही अ.नगर येथे दवाखान्यात गेलो व तेथे एक दिवस उपचार घेतले. त्यानंतर पाटील हॉस्पीटल अ.नगर येथे आम्हाला पाठवले. तेथे पुढील उपचार एक महिना घेतले. त्यानंतर अ.सा.क्र. १ पत्नीने दि. २२/०८/२०१७ रोजी अंभोरा पोलीस स्टेशनला गेलो व आरोपी विरुध्द फिर्याद दिली. पोलीसांनी चौकशी करुन जबाब नोंदवला. पोलीस घटनास्थळी आले व पंचनामा केला. पोलीसांनी घटनास्थळाचे फोटो काढले. साक्षीदारास घटनास्थळाचे ६ फोटो **एम.ओ. २ ते ७** दाखवण्यात आले. फोटोमध्ये मी आहे तसेच वरंवटा पडलेला दिसत आहे. एम. ओ. २ फोटोमध्ये माझे घर आहे. आरोपी आमच्या घराच्या दोन्ही बाजुस राहतात. पाटील दवाखान्यात अ.नगर येथे फिर्यादीचा क्ष-किरण काढला. त्यामध्ये फिर्यादीचे नाकाचे हाड आतुन तुटले होते. उपचार घेतलेबाबत कागदपत्र **नि. ५४** सोबत दाखल केलेले आहेत. सदर कागदपत्रे तीच आहेत.फिर्यादीस आरोपीने ज्या वरंवट्याने मारहाण केली होती ते दाखवल्यास मी ओळखु शकतो. साक्षीदारास जी.एम.पी. क्र. २३/२०२५ मध्ये दगडी वरंवटा दाखवण्यात आला. साक्षीदाराने तोच असल्याचे ओळखले. मुद्देमालास **नि. एम.ओ. -१** वर आहे.

**सरतपास पुर्ण**

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. बी.व्ही. दाणी यांच्यातर्फे उलटतपास सुरु.**

३.		माझे  शिक्षण ८ वी पर्यंत झाले आहे. आरोपी क्र. १ हा माझा चुलत साडु आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ हे कडा येथे आनंदराव धोंडे विद्यालयात प्राध्यापक आहेत. अमान्य की, आरोपी क्र. २ कडा येथे राहतात. अमान्य की, सन-२०१७ साली मी स्वतः ग्रामपंचायत निवडुणकीसाठी उभा होतो. अमान्य की, आरोपी क्र. २ माझ्या विरुध्द उभा होता. अमान्य की, माझा पराभव झाला व आरोपी क्र. २ निवडुन आला. अमान्य की, तेव्हापासुन आमच्यात वाद आहेत. आरोपी क्र. १ चे घर आमच्या घराच्या दक्षिण दिशेला आहे. अमान्य की, आरोपी क्र. २ चे घर त्याच्या शेजारी आहे. अमान्य की, त्याच्या जवळ बबन क्षीरसागर यांचे घर आहे. साक्षीदार सांगतो की, बबनचे घर ६ घरे सोडुन आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या समोर रामभाऊ गरड यांचे घर तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर रस्ता आहे व चोरडीयाचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे घर लोकवस्तीमध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्व साक्षीदार घरातील आहेत.

४.		हे म्हणणे खरे आहे की, दि. २०/०८/२०१७ रोजी सुट्टीचा वार होता. अमान्य की, सुट्टीचा वार असल्याने घटना त्यादिवशी दाखवली. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आईने त्यांना बडबड केली होती. अमान्य की, आम्ही आरोपींना विनाकारण त्रास दिला. शेजारी कोणी भांडणे सोडविण्यासाठी आले नाही. शेजाऱ्यांशी आमचा वाद नाही. समोरचे प्राथमिक उपचार केंद्र बंद असते. दादेगाव पासुन कडा अंतर ९ कि.मी. आहे. हे म्हणणे खरे आहे की, तातडीच्या उपचारासाठी कडा येथे जातो. कडा येथे सरकारी व खाजगी दवाखाने आहेत. आष्टीला येतांना  कड्यावरुन यावे लागते. पोलीसांनी आष्टी येथे पाठवल्यामुळे कडा येथे उपचार घेतले नाही. आष्टी येथे सायंकाळी ७.०० ते ८.०० वाजण्याच्या सुमारास आलो. आष्टी येथे कोणत्या डॉक्टरांनी उपचार केले हे सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आष्टी येथे माझे बरेच नातेवाईक आहेत. निकाळजे विधीज्ञ नातेवाईक आहेत. आष्टी सरकारी दवाखान्यातील गुट्टे डॉक्टर निकाळजे विधीज्ञांच्या शेजारी राहतात. अमान्य की, संगनमताने खोटी तक्रार केली. अमान्य की, डॉक्टर ओळखीचे असल्याने खोटे प्रमाणपत्र दिले. अमान्य की, सरतपासातील नमुद मजकुर खोटा सांगत आहे. अमान्य की, मुद्देमाल जुन्या भंगारात सहज उपलब्ध होतो. अमान्य की, मुद्देमाल आज अस्तित्वात नाही. अमान्य की, मुद्देमाल माझ्या घरातील आहे व मी दिला. मुद्देमाल अंदाजे ४-५ किलोचा आहे.

५.		अमान्य की, मुद्देमाल वरवंटा एका हाताने उचलने अवघड आहे. अमान्य की, सदर जखम मुद्देमालाने मारल्याने होऊ शकत नाही. अमान्य की, घटना घडली नाही. अमान्य की, सरतपासातील मजकुर खोटा सांगत आहे. अमान्य की, आरोपींनी मारहाण केल्याचे खोटे सांगत आहे. अमान्य की, खोटी साक्ष देत आहे. दादेगाव ते आष्टी अंदाजे २५ कि.मी. अंतर आहे. दादेगाव ते अंभोरा हे अंतर ८ कि.मी. आहे. अमान्य की, अंभोरा येथे जाण्यासाठी २० मिनीटे लागतात. मी, माझी पत्नी व भाऊ बाबासाहेब म्हस्के असे सोबत पोलीस स्टेशनला गेलो. अमान्य की, माझ्यावर भा.द.वि. कलम ३०७ प्रमाणे गुन्हा होता. त्यामुळे मला न्यायालयीन कामकाजाचा अनुभव आहे. अमान्य की, राजकीय चळवळीचा माणुस आहे. अमान्य की, दादेगाव येथे मित्र परिवार आहे. घटनेनंतर पोलीसांनी जबाब दि. २२/०८/२०१७ रोजी घेतला. इतर

साक्षीदारांचे जबाब त्या दिवशी घेतलेबाबत माहिती नाही. जबाब आघाव पोलीसांनी नोंदवले. अमान्य की, जबाब पोलीस स्टेशनला नोंदवले. अ.सा.क्र. २ पंच बाबासाहेब म्हस्के माझे भाऊ, भाऊसाहेब गिते मित्र आहेत. अमान्य की, फिर्याद मी पोलीसांना सांगितली.

६. दि. २२/०८/२०१७ रोजी फिर्याद दिली. अमान्य की, फिर्यादी २२ तारखेला फिर्याद देण्याच्या मनःस्थितीत नव्हती. अमान्य की, आरोपीसोबत राजकीय वैमनस्य असल्याने त्रास देण्यासाठी खोटी केस केली. अमान्य की, नि. ५४ वरील वैद्यकीय कागदपत्रे, क्ष-किरण फिर्यादीचे नाहीत व खोटे कागदपत्रे तयार केले. अमान्य की, तपासी अधिकारीसोबत चांगले संबंध आहेत. अमान्य की, दादेगाव जवळ असल्याने पोलीसांची ये-जा असते. अमान्य की, साक्षीदार असलेले पोलीस ओळखीचे आहेत. अमान्य की, राजकीय दबाव असल्याने खोटी फिर्याद दिली. अमान्य की, आरोपीला त्रास देण्यासाठी खोटी केस केली. अमान्य की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

दि.१०.१२.२०२५

श्रवणोत्तर स्वीकृती

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2025.12.11 14:34:24 +0530

श्री. एम. आर.बडाख

**न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, न्यायालय क्रं.३ आष्टी**